बाब क्र. १(अ)

# मुंबई विद्यापीठ

दिनांक २० मार्च, २०२३ रोजी
सकाळी ११.०० वाजता झालेल्या
वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त

**Minutes of the Senate
Meeting held on
20 March, 2023
At 11.00 A.M.**

क्र.का.प्रा.वि/आयसीडी/२०२२-२३/३१८

# मुंबई विद्यापीठ

क्र.१/२०२२-२०२३

अधिसभा इतिवृत्त
दिनांक २० मार्च, २०२३

अधिसभेची वार्षिक सभा सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सर कावसजी जहांगीर दिक्षांत सभागृह, फोर्ट येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत खालील मान्यवर उपस्थित होते :-

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १. | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | उपस्थित |
| २. | डॉ. अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | उपस्थित |
| ३. | प्रा. अनिल सिंग | उपस्थित |
| ४. | प्रा. शिवराम गर्जे | उपस्थित |
| ५. | प्रा. कविता लघाटे | उपस्थित |
| ६. | प्रा. अनिल कुमार सिंग | उपस्थित |
| ७. | डॉ. प्रसाद कारंडे | उपस्थित |
| ८. | प्रा.(सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | उपस्थित |
| ९. | डॉ. किशोर सुखटणकर | उपस्थित |
| १०. | डॉ. अद्वैत एम.वैद्य | उपस्थित |
| ११. | श्री. श्रीपाद वेलिंग | उपस्थित |
| १२. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १३. | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १४ | डॉ. नंदकिशोर रा. मोतेवार | उपस्थित |
| १५ | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित |
| १६ | डॉ. मोहन नामदेव आमृळे | उपस्थित |
| १७ | श्री. किरण रघुनाथ लेले | उपस्थित |
| १८ | ॲड. आशिष चव्हाण | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| १९ | श्री. संतोष परब | उपस्थित |
| २० | श्रीमती वर्षा परचुरे | उपस्थित |
| २१ | श्री. चैतन्य गिरी | उपस्थित |
| २२ | श्री. सुशिलकुमार जाजु | उपस्थित |
| २३ | श्री. भुषन मर्दे | उपस्थित |
| २४ | श्री. मयुरेश पंढरीनाथ नेतकर | उपस्थित |
| २५ | श्रीमती रूची माने | उपस्थित |
| २६ | श्री. धनेश सावंत | उपस्थित |
| २७ | श्री. सुनिल राणे | उपस्थित |
| २८ | श्रीमती वर्षा गायकवाड | अनुपस्थित |
| २९ | श्री. विलास पोतनीस | उपस्थित |
| ३० | डॉ. कुणाल जाधव | उपस्थित |
| ३१ | प्रा. सुनिल भिरूड (प्र. कुलसचिव) | उपस्थित |

सभेची सुरूवात ''वंदे मातरम'' या गीताने झाली. तसेच 'महाराष्ट्र गीत' व 'मुंबई विद्यापीठ' गीत देखील सभागृहात सादर करण्यात आले.

श्रध्दांजली :

मा. कुलसचिवांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, कला इत्यादी क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तींचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे निवेदन केले. या सर्व महान व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी अनमोल योगदान दिले असल्याचे सांगितले.

प्रा. सुनिल भिरूड, (प्रभारी कुलसचिव) यांनी श्रध्दांजली प्रस्ताव मांडले.

श्री. माणिकराव गावित, श्री. राजू श्रीवास्तव, डॉ. प्रमोद तलगेरी, डॉ. रामचंद्र देखणे, श्री. मुलायमसिंह यादव, श्री. विलास खोले, इस्माईल श्रॉफ, मृणालिनी जोशी, संजीव साने, श्री. जमशेद इराणी, इला भट, कुसुम कर्णिक, दीपा गोवारीकर, गजानन दर्णे, राकेश कुमार, सुनील शेंडे, सिध्दांत वीर सूर्यवंशी, कल्याणी कुरळे-जाधव, निवेदिका तबस्सुम, डॉ. मधुसूदन खांबेटे, विक्रम गोखले, विक्रम किर्लोस्कर, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, सुलोचना चव्हाण, राजा बापट, एड्सन अरांतेस दो नासिमेंतो उर्फ पेले, हिराबेन मोदी, केशवराव धोंडग, सुधीर नांदगावकर, केसरीनाथ त्रिपाठी, डॉ. विश्वास मेहेंदळे, डॉ. विश्वनाथ लक्ष्मण देशपांडे, चित्रा नवाथे, सुनिल होळकर, शांताबाई कांबळे, डॉ. दिलीप मालखेडे, प्रा. नारायण राजाध्यक्ष, शांती भूषण, ललिता लाजमी, अच्युतराव

वैद्य, शाहनवाज प्रधान, बेला बोस, डॉ. कनक रेळे, देवीसिंह शेखावत, अजित वर्टी, विष्णू विश्वनाथ करमरकर, सतीश कौशिक, कमलाकर नाडकर्णी.

वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. तद्नंतर नियमित कामकाजाला सुरूवात झाली.

## स्वागत आणि अभिनंदन :-

नवीन सभेचे गठन झालेले आहे. नवीन उपस्थित मान्यवरांचे माननीय कुलगुरुंनी स्वागत केले.

१. मा. विधान परिषदेचे प्रतिनिधी श्री. सुनिल राणे
२. श्री. विलास पोतनिस
३. कुलपतींचे प्रतिनिधी श्री. किरण लेले
४. श्री. संतोष परब
५. श्रीमती वर्षा परचुरे
६. श्री. चैतन्य गिरी
७. श्री सुशिलकुमार एस. जाजु
८. श्री. भुषण मानले
९. श्री. मयुरेश पंढरीनाथ नेतकर
१०. श्रीमती रुची माने
११. श्री. धनेश सावंत
१२. प्राध्यापक अनिल सिंग
१३. प्राध्यापक शिवराम गर्जे
१४. प्राध्यापक कविता लघाटे
१५. डॉ. प्रसाद कारंडे
१६. प्रा. (सीए)प्रदीप कामथेकर
१७. प्रा. किशोर सुखटणकर
१८. श्री. श्रीपाद वेलिंग
१९. डॉ. नंदकिशोर मोतेवार
२०. डॉ. सुनिल पाटील
२१. डॉ. मोहन आमृळे
२२. प्रा. कुणाल जाधव
२३. डॉ. अद्वैत वैद्य

तसेच मा. प्र-कुलगुरु डॉ. अजय भामरे, मा. प्र.कुलसचिव डॉ. सुनिल भिरुड, यांचे स्वागत करण्यात आले.

मा. विधान परिषदेचे प्रतिनिधी श्री. सुनिलजी राणे आणि श्री. विलासजी पोतनिस यांच्याकडून कुलगुरुंचे स्वागत करण्यात आले.

मा. प्र. कुलसचिव डॉ. सुनिल भिरूड यांनी खालीलप्रमाणे विकासात्मक वृतांत सादर केला.

## विकासात्मक वृत्तांत/काही उल्लेखनिय बाबी

- मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलात विविध चार उपक्रमांना सुरुवात करण्यात आली. यामध्ये हरित कॅम्पस अंतर्गत सायकल शेअरिंग योजना, स्मार्ट कंपोस्ट सिस्टीम ॲड ऑर्गेनिक फार्मिंग व पोर्टेबल बायो कंपोस्ट सिस्टीम, सुशोभित तलाव आणि मुंबई विद्यापीठ अँक्सलरेटर सेंटर या उपक्रमांचा समावेश आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.

- मुंबई विद्यापीठामार्फत आयोजित ५५ व्या आंतर महाविद्यालयीन/संस्थात्मक/ विभागीय सांकृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटन राज्याचे माननीय राज्यपाल तथा कुलपती श्री. भगत सिंह कोश्यारी यांचे हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या फोर्ट संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या उद्घाटन सोहळयासाठी प्रमुख पाहूण म्हणून ज्येष्ठ अभिनेते श्री. अशोक सराफ हे लाभले होते. मुंबई विद्यापीठातर्फे अभिनेते अशोक सराफ यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

- मुंबई विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेमार्फत चालविण्यात येणाऱ्या 'संभाषण' या संशोधनपत्रिकेतर्फे- 'द कोव्हिड स्पेक्ट्रम: थिओरॅटिकल अँड एक्सपेरिमेंटल रिफ्लेक्शनस फ्रॅाम इंडिया अँड बियाँड' या महत्वपूर्ण पुस्तकाचे वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांचे हस्ते ऑनलाईन प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात कोरोना महामारीवरील सैद्धांतिकमानसिक प्रतिसाद/तात्विक आणि अनुभवजन्य / मानसिक प्रतिसादांचा समावेश करण्यात आला आहे. पाच खंडांतील सोळाहून अधिक देशांतील विविध क्षेत्रातील तत्वज्ञ, विचारवंत, सामाजिक शास्त्रज्ञ, कलावंत, मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि थेरपिस्ट अशा विविध मान्यवरांनी या पुस्तकासाठी योगदान दिले आहे.

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त व विश्व अहिंसा दिनाचे औचित्य साधून समाजात अहिंसा आणि विश्व बंधुत्वाचा संदेश देण्यासाठी व मूल्याधिष्टित जीवन प्रणालीचे महत्व पटवून देण्यासाठी मुंबई विद्यापीठतर्फे मंगळवार, २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथे **'भजनसंध्या'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

- राजभवनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चॅन्सलर पी.सी. अलेक्झांडर महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय वक्तृत्व स्पर्धा (मराठी) मध्ये विद्यापीठाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

- समृध्द भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी तसेच आपली संस्कृती साता समुद्रापार पोहचविण्यासाठी मुंबई विद्यापीठातर्फे परदेशी विद्यार्थ्यांसोबत दिपोत्सव आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या या दिपोत्सव कार्यक्रमासाठी प्रमुख पाहूणे म्हणून जपानचे कॉऊन्सलर जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता आणि युएस कॉऊन्सलर जनरलचे मुख्य कमर्शिअल हेरॉल्ड ब्रेमॅन हे होते.

- मुंबई विद्यापीठ, रूसा महाराष्ट्र आणि युसीजी एचआरडीसीच्या अंतर्गत विद्यापीठात 'ॲक्रेडिटेशन वे अहेड या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील श्रेयांकन नसलेलया महाविद्यालयांना मूल्यांकन आणि श्रेयांकनासाठी प्रोत्साहन देण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

- १८ व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव 'इंद्रधनुष्य' मध्ये मुंबई विद्यापीठाने बाजी मारत अव्वल स्थान पटकावले आहे. ५ ते ९ नोव्हेंबर २०२२ दरम्यान महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची विजयी मोहोर उमटली आहे. विशेष बाब म्हणजे आतापर्यंत मुंबई विद्यापीठाने स्पर्धेच्या १८ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये तब्बल १७ वेळा हा चषक आपल्याकडे राखण्याचा बहुमान मिळविला आहे. वाङ्मय, ललितकला, संगीत, नाट्य आणि नृत्य या स्पर्धांमध्ये विजयी सलामी देत सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने ११९ गुणांची कमाई करत सर्वसाधारण विजेतेपद मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे.

- मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रामार्फत आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त व्यंगचित्र कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील दीक्षान्त सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर हे लाभले होते. तर एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या फाईन आर्ट विभागाच्या प्राध्यापिका मीरा सावंत यांचीही उपस्थिती लाभली होती. मुंबई विद्यापीठाच्या विविध संलग्नित महाविद्यालयातील एकूण ७० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

- मॉरिशस येथील मराठी संस्कृतिक ट्रस्ट आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विभागाच्या संस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रमा अंतर्गत मुंबई विद्यापीठात मॉरिशस येथील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कला गुणांचा अविष्कार सादर केला. भारतीय विशेषत: महाराष्ट्रीयन संस्कृतीशी घट्ट नाळ जोडलेल्या मॉरिशस येथील विद्यार्थ्यांनी विविध दर्जेदार कला सादर केल्या. यामध्ये गणपती नृत्य, कोळी नृत्य, लावणी, गोंधळ आणि एकल नृत्य सादरीकरण करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमूग्ध केले.

- २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून साजरे केले जावे, ही भारताची सूचना संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने मान्य केली आणि २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय मिलेट वर्ष' म्हणून घोषित झालेले आहे. या घोषणेनंतर भरडधान्यांच्या उत्पादनाला आणि वापराला चालना देण्याचे केंद्र सरकारचे प्रयत्न वेगाने कार्यान्वित झाले आहेत. ह्या पार्श्वभूमीवर शिक्षण प्रसारक मंडळींच्या माटुंगा, मुंबई येथील रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या सयुंक्त विद्यमाने ३० आणि ३१ जानेवारी २०२३ रोजी Millets - 2023 A Transdisciplinary Approach to its Resurgence & Sustainability (भरडधान्य २०२३ - पुनरुत्थान व निरंतरतेचा आंतरशास्त्रीय दृष्टीकोन) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

- मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागामार्फत दरवर्षी देण्यात येणारा कै. प्रा. अ. का. प्रियोळकर स्मृती पारिताषिक पुरस्कार ज्येष्ठ संशोधक डॉ. सुधीर रसाळ यांना प्रदान करण्यात आला. तर सर्वोत्कृष्ट पी.एच.डी. प्रबंध पुरस्कार डॉ. शरद मोहन पाटील यांच्या 'क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावरिल चरित्रपर लेखनाचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधाला प्राप्त झाला आहे. हे पुरस्कार मराठी भाषा दिनांच्या दिवशी २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रदान करण्यात आले.

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे १२ ते १५ जानेवारी २०२३ दरम्यान पार पडलेल्या १५ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने ७९ गुणांसह अंतिम विजेतेपद पटकावून सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे यामध्ये विद्यापीठाने नेत्रदिपक कामगिरी करून १२ सुवर्ण, ५ रौप्य आणि २ कांस्य पदकांची कमाई करत आविष्कार संशोधन स्पर्धेवर मुंबई विद्यापीठाची सलग चौथ्या वर्षी विजयी मोहोर उमटली आहे.

- अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ पुणे येथे दिनांक १० ते ११ जानेवारी, २०२३ रोजी आयोजित केलेल्या अन्वेषण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठाय संशोधन महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार कामगिरी केली आहे. तीन सुवर्ण पदके, एक कांस्य आणि एक रौप्य अशा पदाकांची कमाई करत विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. दोन दिवस चाललेल्या या संशोधन स्पर्धेत पश्चिम विभागीय क्षेत्रातील महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरात राज्यातील एकूण १४ विद्यापीठे सहभागी झाली होती. भारतीय विद्यापीठ संघातर्फे (एआययु) या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

- मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राच्या वतीने आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील एकूण ७९ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धकांनी विद्यानगरी संकुलातील विविध दृश्ये त्यांच्या कॅमेऱ्यात कैद करून उपस्थितांची आणि परिक्षकांची वाहवा मिळवली.

- असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजने आयोजित केलेल्या पाचव्या आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने प्रथम पारितोषिक पटकाविले आहे. १६ ते १७ फेब्रुवारी २०२३ दरम्यान शारदा विद्यापीठ, नोएडा, नवी दिल्ली येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारसाचा एक भाग म्हणून कव्वालीच्या विविध प्रकारांना प्रोत्साहन आणि या कव्वालीच्या विविध प्रकारांना टिकवून ठेवण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते.

- मुंबई विद्यापीठाच्या आंतराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन केंद्राच्या वतीने २२ ते २४ फेब्रुवारी २०२३ या तीन दिवसांत जागतिक घडामोडी व दूरदृष्टी या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय संबंध क्षेत्रातील विविध बौद्धिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन या तीन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात आयोजित करण्यात आले होते.

- मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ २३ फेब्रुवारी २०२३ रोजी पार पडला. या समारंभासाठी राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच व अध्यक्ष, राष्ट्रीय मूल्यांकन मंडळ, नवी दिल्लीचे, प्रा. (डॉ.) अनिल सहस्त्रबुद्धे हे लाभले होते. या वर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून विविध विद्याशाखांतील एकूण २,०७,१४५ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. तर विविध विद्याशाखेतील २७० स्नातकांना विद्यावाचस्पती (पी.एचडी) व २३ एम.फिल. पदव्यांसह विविध परीक्षांमध्ये प्राविण्य संपादन केलेल्या १७ विद्यार्थ्यांना १९ पदके बहाल करण्यात आली.

- ३६ व्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने दर्जेदार कामगिरी करत स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले आहे. एकूण पाच विभागीय स्पर्धांमध्ये ७८ गुणांची कमाई करत अव्वल स्थान पटकावले नाटय् आणि साहित्य विभागातील स्पर्धांवर विजयी मोहोर उमटवत या दोन्ही स्पर्धांचे सर्वसाधारण विजेतेपदही प्राप्त केले आहे. गणपत विद्यापीठ महेसाना, गुजरात येथे १० ते १४ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या युवा महोत्सवाचे महाराष्ट्र आणि गुजरात येथील ३९ विद्यापीठे सहभागी झाली होती.

- मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागामार्फत या शैक्षणिक वर्षापासून मास्टर इन संस्कृत-योगशास्त्र या अभ्यासक्रमाची सुरुवात होणार आहे. या दोन वर्षीय पूर्णवेळ पदव्यूत्तर अभ्यासक्रमाची घोषणा विभागामार्फत नुकत्याच पार पडलेल्या योग –सिद्धांत आणि उपयोजन या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात करण्यात आली.

- संसदीय कार्य मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्फत आयोजित करण्यात आलेल्या १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये पश्चिम विभागीय क्षेत्रात मुंबई विद्यापीठास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणालीची ओळख व्हावी, त्यांच्यातील वक्तृत्व व नेतृत्वगुणांना वाव मिळावा यासाठी संसदीय कार्य मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्फत दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.

- आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने नेत्रदिपक कामगिरी करत सर्वसाधारण सुवर्ण पदक पटकावले आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदाकांची कमाई करत विद्यापीठाच्य शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. भारतीय विद्यापीठ संघातर्फे(एआययु) १६ आणि १७ मार्च, २०२३ रोजी गणपत विद्यापीठ, महेसाना, गुजरात येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी विद्यापीठामार्फेत 'सामाजिक शास्त्रे, मानवविज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन','मुलभूत शास्त्रे.', 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान', 'शेती' आणि 'वैद्यक शास्त्रे' या पाच वर्गवारीतून सादरीकरण करण्यात आले. यामध्ये विद्यापीठास संपूर्ण वर्गवारीतून सुवर्ण पदक तर 'सामाजिक शास्त्रे, मानवविज्ञान आणि व्यवस्थापन' या वर्गवारीत सुवर्ण पदक, वैदक शास्त्रात सुवर्ण पदक तर अभियांत्रिकी वर्गवारीत रौप्य पदक मिळाले आहे.

**गेल्या वर्षभरात मुंबई विद्यापीठाने विविध घटकांच्या सहाय्याने ज्ञानदानाचं आणि त्याच्या प्रचार-प्रचारासाठी जे उल्लेखनिय कार्य केलं त्याचे मा. कुलसचिवांनी पुढीलप्रमाणे सादरी करण केले.**

- मागील शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठाने नॅकची ए++ ही सर्वोच्च श्रेणी ३.६५ सीजीपीए सह मिळवली होती व ती मिळवणारं हे महाराष्ट्रतील पहिलं विद्यापीठ ठरलं होतं. तीच घोडदौड कायम ठेवून मुंबई विद्यापीठाने राष्ट्रीय संस्थात्मक नामांकनामध्ये देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत स्थान पटकावले असून पहिल्यांदाच देशातील सर्वोत्कृष्ट पन्नास विद्यापीठांच्या क्रमवारीत मुंबई विद्यापीठाने ४५ व्या स्थानावर झेप घेतली आहे.

*देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मुंबई विद्यापीठाने उत्साहाने साजरा केला-*

- भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित ७५ कोटी सूर्य नमस्कार संकल्पामध्ये मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने ३१ लाख ३ हजार ७१७ सूर्य नमस्कारांचे योगदान देण्यात आले. त्याचबरोबर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली होती. ३२० फूट लांब आणि ९ फूट रूंद आकाराच्या भव्य तिरंगाने सर्वांचे लक्ष आकर्षित केले होते. लेझीम पथकासह निघालेल्या या पदयात्रेत विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेचे १ हजाराहून अधिक स्वयंसेवक, शारीरिक शिक्षण विभागातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

- प्राध्यापक बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज अँड युथ मूवमेंटस यांच्या वतीने 'स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्र उभारणीत विद्यार्थी आणि युवा चळवळींची भूमिका आणि योगदान' या विषयावर दिनांक १८ व १९ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले .

- सेंटर ऑफ हिंदू स्टडीज यांच्या वतीने दिनांक २५ व २६ फेब्रुवारी २०२२ रोजी 'हिंदू तत्वज्ञान: धर्मग्रंथ इतिहास, राजकारण, व्यापार, वाणिज्य, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, अध्यात्म, शांतता आणि पर्यावरण शास्त्र' या विषयावर आंतर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

- अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १३ व १४ मे, २०२२ रोजी 'सिनेटॉकीज २०२२ भारतीय चित्रपट उद्योगाचे स्वातंत्र लढयातील अतुलनीय योगदान' या विद्यायावर राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आले. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री श्री. अर्जुन राम मेघवाल, ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख, लेखक, दिग्दर्शक व चित्रपट निर्माते चंद्रप्रकाश द्विवेदी, डॉ. सच्चिदानंद जोशी आणि चित्रकार वासुदेव कामत हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

- ठाणे आणि रत्नागिरी उपकेंद्र आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय विज्ञानाचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर दिनांक २९ जुलै २०२२ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

- राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनुसूचित जमातीच्या वीरांचे योगदान' या विषयावर दिनांक २६ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

- साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे अध्यायन केंद्र, मुंबई विद्यापीठ, लोमोनोसोव मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटी, इन्स्टिट्यूट ऑफ ओरिएंटल स्टडीज ऑफ रशियन अकॅडमी ऑफ सायन्सेस, रशियन स्टेट् युनिव्हर्सिटी फॉर हयूमॅनिटीज, पुष्किन स्टेट युनिव्हर्सिटी, सेंट पीटर्स बर्ग युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारत - रशिया राजनैतिक संबंधांची ७५ वर्षे: कला, संस्कृती आणि साहित्यातील प्रतिबिंब' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन मॉस्को, रशिया येथे करण्यात आले होते. या प्रसंगी नामवंत लेखक अण्णा भाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळयाचे अनावरण पॉवेल कुझमिन, ऑल रशिया स्टेट लायब्ररीच्या मार्गारीटा रुडूमिनो आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते मास्को येथे झाले.
- विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण उपक्रम उपलब्ध करून देणे हे मुंबई विद्यापीठाचे वैशिष्ट आहे. मुंबई विद्यापीठात या शैक्षणिक वर्षापासून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची सुरूवात होत आहे. विद्यापीठ पातळीवर विविध विषयांना एका छत्राखाली आणण्यासाठी स्कूल संकल्पना राबवली जाणार आहे. विविध विद्याशाखा अंतर्गत असणाऱ्या विषयांची ओळख आणि ते विषय शिकण्याची संधी यानिमित्ताने विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकेल. या संकल्पने अंतर्गत स्कूल ऑफ इंडियन लॅग्वेजेस, स्कूल ऑफ इंग्लिश ॲड फॉरेन लॅग्वेजेस, स्कूल ऑफ सोशल सायन्सेस आणि स्कूल परफॉमिंग आर्ट्स अशा विविध स्कूल्सची स्थापना करणात आली.
- क्रीडा क्षेत्रासाठी मुंबई विद्यापीठाने नवनव्या उपक्रमांची जोड देण्यास प्रारंभ केला आहे. शरीर सौष्ठव, विविध खेळ आणि त्यातील करीअरच्या संधी यासह आरोग्यदायी समाज घडविण्याच्या हेतूने मुंबई विद्यापीठात 'सेंटर ऑफ एक्सलेंस इन स्पोर्ट्स सायन्स अँड मॅनेजमेंट' या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.
- मुंबई विद्यापीठाच्या सर्व घटकांसाठी जागतिक दर्जाच्या विद्यापीठांशी सहकार्य करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने व जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय संस्थासोबत सामंजस्य आणि साहचर्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने मुंबई विद्यापीठात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आणि साहचर्य केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राच्या स्थापनेमुळे प्रमुख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठे आणि संस्थांसह आंतरराष्ट्रीय संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी ध्येय-धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे अधिक सोयीचे होणार आहे.
- गुणीजनांचा योग्य सन्मान करण्याचा मुंबई विद्यापीठाचा प्रघात आहे. त्यानुसार जागतिक कीर्तीचे तबलावादक पद्मभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचा संगीत क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मुंबई विद्यापीठाने विशेष दीक्षान्त समारंभ मानद एल.ए.डी. पदवी देऊन सन्मान केला.
- आंतरराष्ट्रीय आणि आंतरविद्याशाखीय डायस्पोरा अभ्यासाला चालना देण्यासाठी म्युस्टार युनिव्हर्सिटी, जर्मनी यांच्या समवेत सामंजस्य करार करण्यात आला .

- टेम्पल युनिव्हर्सिटी, अमेरिका व कॉमनवेल्थ सिस्टीम ऑफ हायर एज्युकेशन यांच्या समवेत फ्रेंच भाषेमध्ये शिक्षकांचे प्रशिक्षण तसेच प्राध्यापक व विद्यार्थी परस्पर साहचर्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

- असोसिएशन ऑफ कॉमनवेल्थ युनिव्हर्सिटी यांच्या बरोबरही वर्धित आणि मिश्रित शिक्षणासाठी परस्पर साहचर्य करार करण्यात आला.

- वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील संशोधनासाठी ऑस्ट्रेलियाच्या एडिथ कोवन विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे .

- विद्यापीठाने सैद्धांतिक आणि संगणकीय विज्ञानातील उत्कृष्टता केंद्राची स्थापना केली आहे. याद्वारे मूलभूत अभ्यासक्रमांच्या अध्ययन व अध्यापनामध्ये जगभरातील उत्कृष्ट शिक्षक आणि संशोधक यांचा समावेश करून संशोधनास आवश्यक असणाऱ्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याची विद्यापीठाची जना आहे. याद्वारे इथल्या संशोधकांना भारतातील आणि परदेशातील अन्य संस्थांमध्ये आणि शास्त्रज्ञांबरोबर जोडण्याचा हे केंद्र प्रयत्न करेल .

- मुंबई विद्यापीठाने जैवविविधता ऑडिट केले आहे. यासाठी ओपन डेटा किट वापरले गेले असून त्याद्वारे विविध वनस्पतींचे जिओ टॅगिंग केले गेले आहे. ओपन सोर्स सॉफ्टवेअरच्या मदतीने वनस्पती, पक्षी व प्राणी यांचे मॅपिंग केले गेले. प्रत्येक वनस्पती प्रजातीसाठी वेगळा QR कोड, प्लास्टिक मुक्त परिसरासाठी स्वतंत्र मोहीम, ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायो कंपोस्टिंग प्लांट, विद्यानगरी परिसरातील तलावाचे नूतनीकरण आणि सुशोभीकरण, बागकामासाठी सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी स्टार्टअप उपक्रम, संलग्न महाविद्यालयाच्या ग्रीन ऑडिट साठी स्टार्टअप प्रकल्प व विद्यानगरी परिसराचे एनर्जी ऑडिट हे ही उपक्रम राबवण्यात आले.

- मेरीटाईम स्टडीज अँड ओशनोग्राफी यांचा विद्यार्थी आणि संशोधक यांना प्रशिक्षण देण्यासाठी CSIR-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, गोवा यांच्या समवेत सामंजस्य करार, मेरीटाईम स्टडीज अँड ब्लू इकॉनोमी विषयातील संशोधनाला उत्तेजन देण्यासाठी मायक्रोटेक ग्लोबल फाउंडेशन बरोबर सामंजस्य करार, संत रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याबरोबर बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या साह्याने किनवट परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी सामंजस्य करार, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांच्याबरोबर विविध सामाजिक प्रकल्पांसाठी सामंजस्य करार तसेच आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याबरोबर विविध शैक्षणिक प्रकल्पांसाठी सामंजस्य करार मुंबई विद्यापीठाने केले आहेत.

- वित्त व लेखा विभागाने विद्यापीठाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे.

- मुंबई विद्यापीठामार्फत येत्या शैक्षणिक वर्षात विविध नवनवीन अभ्यासक्रमांची सुरूवात केली आहे. त्याचबरोबर अनेक उदयोन्मुख, आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. विशेष म्हणजे भविष्यकालीन शिक्षण, चौथी औद्योगिक क्रांती आणि नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची सांगड घालण्यासाठी विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. प्रगत संशोधन आणि अभ्यासासाठी विद्यापीठात 'एमयु एक्सलेटर सेंटर' ची स्थापना झाली आहे. आंतर-विद्याशाखीय आणि बहुविद्याशाखीय संशोधनाच्या क्षेत्रात या केंद्राची भूमिका अधोरेखित होणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून अत्यंत प्राचीन संस्कृती, मानवनिर्मित साहित्य, पुरातन काळातील अनेक बाबींबरोबरच बायोमेडिकल आणि अणूउर्जेच्या संशोधनात विद्यापीठ महत्वाची भूमिका बजावणार आहे.

- मुंबई विद्यापीठ हे जवळपास सातशेहून अधिक कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेले वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठ आहे. या दृष्टीने मत्स्यपालन क्षेत्रात संशोधन आणि विकासाच्या संधीचे नवीन दालन खुले करण्यासाठी मुंबई विद्यापीठ आणि केंद्रीय मत्स्यपालन संस्था यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये शैक्षणिक आदान - प्रदान संशोधन आणि सहयोग या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे .

- मुंबई विद्यापीठ व राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असून या करारान्वये विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी व समाजाभिमूख नाविन्यपूर्ण संशोधन करण्याची संधी यानिमित्ताने ग्रामीण भागातील प्राध्यापकांना उपलब्ध झाली आहे .

- मुंबई विद्यापीठात नव्याने सुरु करण्यात आलेल्या सेंटर फॉर हिंदू स्टडीज या केंद्राच्या वतीने मास्टर ऑफ आर्टस इन हिंदू स्टडीज हा दोन वर्षीय पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

- विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील ज्ञान स्रोत केंद्रासाठी (राजाबाई टॉवर ग्रंथालय) टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनकडून रुपये ७५ लाखांची देणगी प्राप्त झाली आहे.

- UTI आणि SEBI चे माजी अध्यक्ष व मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी या विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. एस.ए. दवे यांनी विभागाच्या शताब्दी वर्षात पाच कोटी रुपयांची देणगी, सेंटर फॉर रिसर्च अँड टीचिंग इन फायनान्स या केंद्राच्या स्थापनेसाठी दिली. या केंद्राच्या वतीने वित्तीय क्षेत्रातील मोठे यश मिळवणाऱ्या नामांकित तज्ञांना आमंत्रित करून एक चर्चासत्रांची मालिका सुरू करण्यात आली आहे. या मालिकेतील पहिले भाषण श्री. दीपक पारेख यांनी २२ ऑगस्ट २०२२ रोजी दिले.

- कणकवली तालुक्यातील तळेरे येथील मुंबई विद्यापीठाच्या विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी मॉडेल कॉलेजचे आणि वेंगुर्ले येथे होत असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सागरी अभ्यास प्रकर्ष केंद्राचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे आदरणीय राज्यपाल श्री.भगत सिंग कोश्यारी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

- मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील महाड आणि चिवळूण येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि उध्दवलेल्या पूरपरिस्थितीमुळे अनेकांवर संकटकालीन परिस्थिती ओढवली होती. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपत मुंबई विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलून गरजवंतांना अन्नाचे वाटप करण्यासाठी महाड व चिपळून येथे कम्युनिटी किचन सुरू केले होते. या कम्युनिटी किचन द्वारे दररोज ३०० गरजू लोकांच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि विद्यार्थी विकास विभागाने याकामी पुढाकार घेतला होती.

- मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागात शिकत असणाऱ्या गरजू, आर्थिक दुर्बल आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागामार्फत मदतीचा हात पुढे करत रुपये १ कोटी ७७ लाख ३७ हजारांचे अर्थसहाय्य केले आहे .

- मुंबई विद्यापीठातील मुंबई स्कूल इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी विभागाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आभासी पध्दतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी डॉ. कृष्णमुर्ती सुब्रमण्यन, मुख्य आर्थिक सल्लागार, भारत सरकार यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

***मुंबई विद्यापीठाने क्रीडा, सांकृतिक महोत्सव, संशोधन आदी क्षेत्रातही आपली मोहोर उमटवली आहे-***

- असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ महिला रग्बी स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम क्रमांक संपादित केला आहे.
- मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, क्षेत्रीय निर्देशालय पुणे, आणि युवा व क्रीडा मंत्रालय भारत सरकारच्या सयुंक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात दिनांक २२ ते २८ मे २०२२ या दरम्यान सात दिवसीय राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले .

- विद्यार्थी विकास विभागाच्या गौरवपूर्ण कामगिरीचा उल्लेख आवर्जून केला पाहीजे. यंदाच्या वर्षीही मुंबई विद्यापीठाने माननीय कुलपती कार्यालय, राज भवन, मुंबई यांनी आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्य पातळीवरील इंद्रधनुष्य युवा महोत्सवाचे विजेतेपद ११९ गुणांसह पटकावले आहे. इंद्रधनुष्य युवा महोत्सवाच्या १८ वर्षाच्या कारकिर्दीत हे विद्यापीठाचे १७ वे विजेतेपद आहे. विभागाचे चॅन्सलर पी. सी. अलेक्झांडर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सुवर्णपद प्राप्त केले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी विकास विभागाने असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठाय युवा महोत्सवाच्या विजेतेपदाची अखंड पंरपरा याही वेळी कायम राखली. याचबरोबर अखिल भारतीय कव्वाली स्पर्धेचे अजिंक्यपदही आमच्या विद्यार्थ्यांनी नुकतच मिळवलं आहे.

- कला आणि क्रीडा या क्षेत्रांबरोबरच आमचे विद्यार्थी संशोधन क्षेत्रातील मागे नाहीत. माननीय कुलपती कार्यालय, राज भवन, मुंबई यांनी आयोजित केलेल्या 'आविष्कार' या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय संशोधन स्पर्धेमध्ये विद्यार्थी विकास विभागाच्या विद्यार्थ्यांनी सलग चौथ्यांदा अंतिम विजेतेपद पटकाविले आहे तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्लीयांनी आयोजित केलेल्या 'अन्वेषण' या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय संशोधन स्पर्धेमध्ये देखील विद्यार्थी विकास विभागाच्या विद्यार्थ्यांनी ३ सुवर्णपदके, १ रौप्य पदक आणि १ कांस्य पदक प्राप्त करून सर्वात जास्त पारितोषिके पटकाविली आहेत.

- संसदीय कार्य मंत्रालय नवी दिल्ली आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या मार्फत मुंबई विद्यापीठात १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले .

- मुंबई विद्यापीठामार्फत आयोजित ५५ व्या आंतरमहाविद्यालयीन/संस्थात्मक/विभागीय सांस्कृतिक युवा महोत्सव अंतिम फेरीचे उद्घाटन राल्याचे आदरणीय राज्यपाल तथा कुलपती श्री.भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या फोर्ट संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या उद्घाटन सोहळयासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते श्री. अशोक सराफ हे लाभले होते. या प्रसंगी मुंबई विद्यापीठातर्फे अभिनेते अशोक सराफ यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष पुरस्कार अभिष्टचिंतन करण्यात आले.

- अन्य देशांतील विद्यापीठांसमवेत मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक आदानप्रदान सुरू असते. मॉरिशस येथील मराठी सांस्कृतिक ट्रस्ट आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या सांस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रमाअंतर्गत मुंबई विद्यापीठात मॉरिशस येथील विद्यार्थ्यांनी त्यांच्या कला गुणांचा अविष्कार सादर केला. भारतीय विशेषत: महाराष्ट्रीयन संस्कृतीशी घट्ट नाळ जोडलेल्या मॉरिशस येथील विद्यार्थ्यांनी विविध दर्जेदार कार्यक्रम सादर केल्या. यामध्ये गणपतीनृत्य, कोळीनृत्य, लावणी, गोंधळ आणि एकल नृत्य सादरीकरण करून उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

- मुंबई विद्यापीठाच्या अँकेडमी ऑफ थिएटर आर्ट्स, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १३ व्या राष्ट्रीय वंसत नाट्योत्सवाचे आयोजन दिनांक ११ ते १८ मार्च २०२३ दरम्यान करण्यात आले होते.

- पद्मश्री महाराष्ट्र शाहीर कृष्णराव साबळे आणि वगसम्राट दादू इंदुरीकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमी, शाहीर अमरशेख अध्यासन आणि सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र सरकार यांच्यातर्फे १३ व १४ मार्च २०२३ रोजी राष्ट्रीय चर्चासत्र आणि परंपरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

- पहेले इंडिया फाऊंडेशन द्वारा मुंबई विद्यापीठात दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी 'ब्रेनस्टॉर्मिंग सेशन अँड युथ कन्सलटेशन भारत एट १००' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नीति आयोग भारत सरकारचे माजी उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आयोजित आंतरराज्य छात्र जीवन दर्शनच्या माध्यमातून पूर्वांचलमधून आलेल्या सर्व प्रतिनिधींच्या नागरी स्वागत समारोहासाठी नागरी अभिनंदन समारोह आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोजी करण्यात आले होते. राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास अभाविपचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री. आशिष चौहान यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.
- विद्यार्थ्यांना केवळ पदवी नव्हे तर विविध कौशल्ये विकसित करून आर्थिक सक्षमता प्राप्त करून देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महत्वाचे असल्याचे मत मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला- वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाच्या वतीने १ फेब्रुवारी रोजी 'नवे शैक्षणिक धोरण २०२० : अंमलबजावणी आणि पुढील वाटचाल' या विषयावरील एक दिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. चर्चासत्राचे आयोजन रामानंद आर्य डी.ए.व्ही. स्वायत्त महाविद्यालय आणि जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत सध्या सुरु असलेल्या ३ वर्षाच्या अभ्यासक्रमावरून ४ वर्षाच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करण्याची योजना व त्याबाबतचा आराखडा तयार करणे, एकसमान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, सामान्य अध्यापनशास्त्राऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा आराखडा तयार करणे यासंदर्भात शासनाने मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठण केले. या समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला असून याच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठामार्फत पुढाकार घेतला जात आहे.
- दिनांक १७ मार्च २०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई विद्यापीठात 'एकेडमिक बँक ऑफ क्रेडीटवर कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी राज्यातील सर्व विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळांचे संचालक, स्वायत्त महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते.
- 'जनजाती नायकांचा स्वातंत्र्य लढ्यात योगदान' यावर सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील निवडक ६० प्रतिनिधी या कार्यशाळेत सहभागी झाली होती.

- मुंबई विद्यापीठ आणि वीरमाता जीजाबाई तंत्रज्ञान संस्था आणि भारतीय शिक्षण मंडळ व रिसर्च फॉर रिसर्जेंस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी एकेडमिक लीडरशिप अलायनमेंट प्रोग्राम (आलाप) या कार्यक्रमाचे ७ आणि ८ जानेवारी २०२३ रोजी कलिना संकुलातील ग्रीन टेक्नॉलॉजी सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.
- मागील वित्तीय वर्षामध्ये मुंबई विद्यापीठास सीएसआर निधीअंतर्गत १ कोटी १० लाखांचे अनुदान प्राप्त झाले. यामध्ये टाटा समुहाकडून सर्वाधिक ८० लाखांचा निधी प्राप्त झाला आहे.
- २०१७ ला मुंबई विद्यापीठात स्थापन झालेल्या सेंटर फॉर युरोपियन स्टडीजच्या कराराचे नुतनीकरण करण्यात आले असून या कराराअंतर्गत वार्षिक ७००० युरोचे अनुदान विद्यापीठास प्राप्त होत असते. या केंद्राच्या माध्यमातून पूर्णवेळ एम.ए. (युरोपियन साहित्य आणि संस्कृती, आणि आंतरराष्ट्रीय ड्युअल डिग्री अभ्यासक्रम (मास्टर सीएलई) राबविला जातो. यामध्ये युरोपियन संघ आणि इतर विद्यापीठाच्या यामध्ये बोलोगना, स्ट्रासबर्ग, मलहाऊस, थेस्सालोनिकि, लिसबॉन, मॉस्को आणि सेनेगल यांच्या सहाय्याने हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो. आशिया खंडातील मुंबई विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ या संघटनेचा भाग आहे. काउँसिल आफ युरोपने या अभ्यासक्रमाला इरॅसमस मंडस ब्रॅंडचा पुरस्कार दिला आहे.
- राष्ट्रीय सेवा योजना पारितोषिक राष्ट्रीय स्तर २०२०-२१ चा पुरस्कार मुंबई विद्यापीठाच्या सुशील राम शिंदे यांना जाहीर झाला. माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.
- राष्ट्रीय आणि राज्य गणतंत्र दिवस परेडकरीता विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.
- मनाली येथे १२ ते २३ ऑक्टोबर २०२२ दरम्यान पार पडलेल्या ''नेशनल एडव्हॅंचर कॅंपसाठी'' राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.
- १९ ते २८ डिसेंबर २०२२ दरम्यान कवियीत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आव्हान शिबिरात १७५ स्वयंसेवक आणि ९ कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.
- देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांच्यावर सुधा मूर्ती, अरविंद पानघडिया, एस. जयशंकर, सदगुरु आणि नंदन निलेकणी या मान्यवरांनी मिळून लिहलेल्या " मोदी@२०: ड्रीम्स मीट डेलिवरी" या पुस्तकाचे बहुआयामी परीक्षण केंद्रीय राज्य शिक्षण मंत्री डॉ. सुभाष सरकार यांनी मुंबई विद्यापीठात केले. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमासाठी विद्यापीठातील अनेक प्राध्यापक उपस्थित होते.

मा.कुलसचिवांनी सूचीपत्रिकेतील बाब एक सादर केली.

बाब क्र. १ : दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण अधिसभेचे इतिवृत्त संमत करणे.

**ठराव** : संबंधित अधिसभेचे इतिवृत्त माननीय सदस्यांना पाठविण्यात आले होते. त्यावर सदस्यांचा काही सुचना असल्यास तर सदस्यांना मांडण्याची विनंती करण्यात आली.

तसेच पुढील पानावरती बैठकीचे इतिवृत्त देण्यात आले आहे. पान एक वर उपस्थिती बाबत आहे. पान २ वर सदस्यांच्या काही सुचना असल्यास आपण पान ३, पान ४, आणि पान ५, जर सदस्यांचे काही म्हणणे असल्यास आपण सुचवू शकता.

मा. कुलसचिवांनी इतिवृत्त मंजूर झाले असे सभेस सांगितले त्याला श्री. धनेश सावत यांनी अनुमोदन दिले. .

बाब क्र. २ : प्रश्नोत्तराचा तास.

ठराव : कुलसचिवांनी प्रश्नोत्तराच्या तासात कुठलाही प्रश्न न आल्यामुळे ही बाब इथे विचारात घेतली जाणार नाही असे नमूद केले.

आमदार श्री. सुनील राणे यांनी सभागृहात सूचना केली की, कोणाला प्रश्न विचारायचा असेल तर प्रशासनाने अधिकाऱ्यांनी आधी त्यांच्याकडून प्रश्न मागवून घेतले पाहिजे आणि त्या प्रश्नांना नंतर उत्तरे दिली पाहिजे. त्या उत्तरांनी जर सदस्यांचे समाधान नाही झाले तर ती बाब किंवा तो प्रश्न विद्यापीठाच्या पटलावर किंवा तुमच्या नोंदवही मध्ये घ्यावा. म्हणजे त्या बैठकीला सुसूत्रता येईल तसेच विद्यापीठाच्या कामामध्ये सुसूत्रता येईल असे सभागृहात स्पष्ट पणे मत मांडले .

आमदार सुनील राणे ह्यांनी बैठकीबाबत आमदार निधीतून सुसज्ज असा सुंदर सभागृह ते बांधून सर्व खर्च ते करतील फक्त सभागृहाची जागा विद्यापीठ देईल सुसज्ज बनविण्याचा सर्व खर्च आमदार निधीतून देण्याचे आश्वासन त्यांनी सभेला दिले.

अशी एकदिवसीय सभा न ठेवता दोन दिवस सभा घेण्याबाबत सुचना केली. सभेत प्रगतशील चर्चा झाली पाहिजे टिकात्मक नको अशीही सूचना त्यांनी केली. उदा. देताना त्यांनी श्री. सुधाकर तांबोळी यांनी अधिसभेच्या बैठकीचे चित्रफीत मुद्रित करण्यास कोणती अडचण आहे असा प्रश्न विचारला आहे. ह्या संदर्भात आमदार राणे म्हणाले की, विधानसभेचे, लोकसभेचे चित्रफीत मुद्रित होते. मग यात अडचण कसली ह्यासाठी जर राज्यपाल महोदयांची मान्यता घ्यावी लागत असेल तर त्यांच्याकडे आपण शिष्टमंडळ घेऊन जाऊ आणि मान्यता घेवू पण चित्रफीत मुद्रित झालेच पाहिजे असे मत अधिसभेत व्यक्त केले.

श्री. विलास पोतनीस यांनी कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांच्या प्रभारी पदावर आक्षेप घेतला असूने त्यांच्या कायम नियुक्त्या कधी होणार हा प्रश्न उपस्थित केला. तसेच अधिसभा सदस्यांची नोंदणी पूर्ण होऊन सात-आठ महीने उलटून गेले तरीही अधिसभेच्या निवडणूका प्रलंबीत आहेत,या प्रश्नावर चर्चा झाली. तसेच दूसरा प्रश्न त्यांनी कलिना परिसराच्या विकास आराखडयाबाबत एमएमआरडीए सोबत झालेल्या कराराबाबतचा घेतला. एमएमआरडीए यांनी अजूनही योग्य तो मोबदला विद्यापीठास दिलेला नाही आणि तो कधी मिळणार या संदर्भात सुध्दा प्रश्नार्थक चर्चा झाली. तसेच तिसरा प्रश्न त्यांनी विद्यापीठातील बाराशे अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतचा निर्णय घेताना संपूर्ण भत्यासहित पूर्ण वेतन, महिलांसाठी लागणाऱ्या रजा व त्यांच्या अडचणी दूर कराव्या अशी विनंती केली.

मुंबई विद्यापीठातून दरवर्षी दोन ते अडीच लाख विद्यार्थी पदवी घेऊन विद्यापीठातून बाहेर पडतात तर त्यांच्यासाठी नोकरीच्या संदर्भात प्लेसमेंट, समुपदेशन केंद्र तसेच एमपीएससी यूपीएससी हया परीक्षेसाठी मार्गदर्शन केंद्र उपलब्ध करावे. त्यांचा मुलांना लाभ घेता येईल अशी विनंती केली आणि हयासाठी शासनाकडून लागणारे सर्व सहकार्य करण्याची जबाबदारी स्विकारून तसे आश्वासन त्यांनी दिले.

प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे यांनी श्री. विलास पोतनीस यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले मा. कुलगुरू यांच्या नेमणुक पदाची जाहिरात १३ मार्चला आली आहे. सदर पदासाठी अर्ज करण्याची तारीख १५ एप्रिल आहे. कुलगुरूंची नियुक्ती झाल्यानंतर प्र-कुलगुरू, कुलसचिव हयांच्याही नियुक्त्या करण्याचा अधिकार कुलगुरूंना आहे. अधिसभा सदस्यांच्या मतदार यादयांचे काम होऊ घातले आहे. त्यांच्याही निवडणुका जाहीर होतील, असे सभागृहात स्पष्टपणे सांगितले.

मा. आमदार श्री. सुनील राणे यांनी एनईपी २०२३ च्या बाबतीत स्मिता शुक्ला यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे तर त्यांनी हया विषयावर किती काम केले आहे. अहवाल, कृती आराखडा बनवला आहे का? असा प्रश्न सभागृहात केला. २०२३ मध्ये विद्यापीठातील किती महाविद्यालयांमध्ये एनईपी सुरू करणार आहेत अशा प्रश्नांबाबत सभागृहात चर्चा झाली.

तसेच प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे यांनी एनईपी च्या अभ्यासक्रमाबाबत प्रा. आर. डी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एक अहवाल तयार करून महाराष्ट्र शासनाकडे पाठवला त्यांनी तो स्वीकारला. त्यानंतर पूर्ण महाराष्ट्रात अकरा विद्यापीठांमध्ये एनईपी सुरू करण्यासाठी सुकाणू समिती स्थापन केली त्यात प्र-कुलगुरू डॉ. अजय भामरे, प्रा. आर.डी. कुलकर्णी अध्यक्ष म्हणून पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू करमळकर आहेत हे स्पष्ट केले. काही सब कमिटया नेमल्या आहेत. सुकाणू समितीची पुढील बैठक पाच-सहा एप्रिल पुणे येथे होईल आणि संपूर्ण अहवाल महाराष्ट्र सरकारला सादर करेल. एनईपीसाठी काही कार्यशाळा घेतल्या गेल्या त्यात सगळया विद्यापीठातील प्र-कुलगुरू अधिष्ठाता उपस्थित होते.

बाब क्र. ३ : **विद्यापीठाच्या सन २०२३-२४ या वित्तिय वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक तसेच सन २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करून मंजूर करून घेण्याबाबत.**

**ठराव** : कुलसचिवांनी मुंबई विद्यापीठाने सन २०२३-२०२४ या वर्षासाठी वित्तिय अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक' तसेच २०२२-२३ चे सुधारीत अंदाज अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक' सादर करून मंजूर करून घेण्याबाबत वित अधिकारी प्रा. (सी.ए.) कामथेकर यांना सादर करण्यास सांगितले.

प्रा.(सी.ए.) कामथेकर यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मुंबई विद्यापीठाने वर्ष २०२२-२३ चा सुधारित व २०२३-२०२४ मुळ अर्थसंकल्पीय अंदाज आणि आर्थिक स्थितीचे विवरणपत्र सभेसमोर सादर करत असताना प्रा.(सी.ए.) कामथेकर यांनी विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी दिल्याबद्दल मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू व्यवस्थापन परिषद आणि वित्त व लेखा समिती यांचे आभार मानले व खालीलप्रमाणे अर्थसंकल्प सादर केले.

विद्यापीठातील विविध विभाग, संस्था व कक्ष यांच्या योजना, कार्यक्रम व आवश्यकता विचारात घेऊन मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने विद्यापीठ उपपरिसर(बी.एस.सी) ३९ (आय), विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ (बी.यु.आय.डी. ४३(सी)), आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ (बी.एल.एल.ई. ४६(सी)), परिक्षा व मुल्यमापन मंडळ (बीओई ४८(सी)), माहिती तंत्रज्ञान मंडळ (बी.ओ.आय.टी. ५०(बी)) व इतर संबंधित कलमान्वये दिलेल्या अधिकारान्वये तयार करण्यात आलेले सन २०२२-२०२३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक व सन २०२३-२०२४ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रका मसुदा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ९४(६)(ऐ) अन्वये मान्यतेसाठी तयार करण्यात आलेला आहे व विद्यापीठाच्या वित्त व लेखा समिती तसेच व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरून निश्चित केलेल्या तरतुदींनुसार हा अर्थसंकल्प मी सभागृहात सादर केला.

तसेच, प्रस्तुत अर्थसंकल्पीय अंदाज तीन भागांमध्ये सादर करण्यात आला आहे. हे भाग पुढील प्रमाणे:

भाग १ व २ - परिरक्षण आणि विकास व भाग ३ मध्ये स्वतंत्र प्रकल्प, योजना व सहयोगी उपक्रमासाठी अनुदान. केंद्रशासन /राज्य शासन/ विद्यापीठ अनुदान मंडळ आणि अन्य संस्था यांनी मान्यता दिलेल्या आणि आर्थिक सहाय्य केलेल्या योजनांचा सारांश विभागनिहाय दाखविण्यात आला आहे.

सर्वसाधारण चर्चेसाठी प्रस्तावाचा भाग म्हणून अधिसभेच्या सर्व सदस्यांना विद्यापीठाच्या आर्थिक बाबी, प्रशासकीय बाबी आणि अन्य उपक्रम या संबंधी चर्चा करता येणे शक्य होईल.

त्यानंतर दुरूस्ती प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी प्रस्तावाच्या दुस-या भागाकडे वळता येईल, असे सभागृहात मांडले.

अधिसभा वर्ष २०२२-२३ चा सुधारीत व वर्ष २०२३-२०२४ चा मुळ अर्थसंकल्प विचारात घेऊन त्यावर विचारविनिमय करून तो संमत केला जाईल.

तसेच, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार भाग एकचा प्रस्ताव प्रा.(सी. ए.) कामथेकर यांनी सभेसमोर सादर केला.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २९(छ)" ला अनुसरून व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्राचा (ज्यामध्ये २०२२-२०२३ वर्षाचा सुधारीत अंदाज तसेच २०२३-२०२४ वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज यांचा समावेश आहे) विचार अधिसभेने करावा, अशी सभागृहास विनंती केली.

तसेच, आपल्या विद्यापीठाच्या वैशिष्ठयपूर्ण अशा वित्तीय, प्रशासकीय, शैक्षणिक आणि अन्य बाबी आपल्यासमोर ठळकपणे मांडणे रास्त ठरेल असेही सांगीतले.

वाढ आणि विकास :

परिशिष्ट २ मधील विवरण पत्र 'अ' मध्ये विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची संख्या नमूद करण्यात आली आहे. वर्ष २०१३-२०१४ मध्ये एकुण महाविद्यालयांची संख्या ७०७ असून वर्ष २०२२-२०२३ मध्ये ती ८६० इतकी झाली आहे. ही वाढ एकूण १७.७९ टक्के झाली आहे. विद्यापीठामध्ये एकुण ५७ पदव्युत्तर विभाग आहेत, त्यामध्ये संस्था व अभ्यास केंद्रे यांचाही समावेश आहे.

तसेच विद्यार्थ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. वर्ष २०१३-२०१४ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ६,८७,४४२ इतकी असुन, ही विद्यार्थी संख्या वर्ष २०२२-२०२३ मध्ये ८,५६,५७१ इतकी झालेली आहे. याचा अर्थ गेल्या दहा वर्षात विद्यार्थ्यांच्या संख्येत १९.७४ टक्के इतकी वाढ झालेली आहे. अशी माहिती सभागृहास दिली.

२०२३-२०२४ या वर्षामध्ये नियोजित बांधकामे खालीलप्रमाणे आहेत.

१. हिंदी व उर्दु भाषा भवन
२. तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे निवासी संकुल व सामुदायिक सभागृह
३. प्रो.बाळ आपटे दालन
४. स्कुल ऑफ लॅग्वेजेस् इमारत (२ रा टप्पा)
५. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह (२ रा टप्पा)
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र
७. डेव्हलपमेंट ऑफ वेंगुर्ला सब कॅम्पस्

आर्थिक स्थिती वर्ष २०२२-२३ चे सुधारीत अंदाज
२०२२-२०२३ या वर्षी रु.७३.८८ कोटी तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. तथापि हया वर्षाच्या सुधारित अंदाजपत्रकात रु.३३.६८ कोटी एवढी तूट अपेक्षित आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२०२३ साठी मिळालेली देणगी :

| अ.क्र. | निधी देणाऱ्यांचे नाव | प्रयोजन | प्राप्त रक्कम (रू) |
|---|---|---|---|
| १ | (डॉ.) सौ. साधना कामतकर | (डॉ.) सौ. साधना कामतकर यांच्याकडून एम.एस्सी. मध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला "कै. सुहास गणेश मुळये पारितोषिक" या नावाने मिळालेली देणगी. कॉम्प्युटर सायन्समध्ये. | ३,००,०००/- |
| | एकुण | | ३,००,०००/- |

विद्यापीठाच्या प्रकल्पांना सहृदयतेने व उदारपणे देणगी देणा-या सर्व दात्यांचे प्रतींबाबती कृतज्ञता व्यक्त करून तसेच हया देणग्या मिळवण्यासाठी ज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्या सर्व शुभचिंतकांचे ही आभार मानतो.

वर्ष २०२३-२०२४ अर्थसंकल्पीय अंदाज:

आवर्ती खात्यात ०.२६ कोटी रुपयांचे तूट आणि अनावर्ती खात्यात ९९.२० कोटी रुपयांची तूट असल्यामुळे वर्ष २०२३-२०२४ ची निव्वळ तूट ९९.४५ कोटी रुपये एवढी आहे.

**आवर्ती खात्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:**

| | |
|---|---|
| एकुण आवर्ती उत्पन्न | रु. ६९०.६२ कोटी |
| एकुण आवर्ती खर्च | रु. ६९०.८८ कोटी |
| आवर्ती खात्यातील एकुण तूट | रु. ०.२६ कोटी |

वरील आवर्ती खर्चामध्ये खालील योजनांवरील खर्चाचा समावेश करण्यात आला आहे.

१. शिक्षकांसाठी संशोधन अनुदान
२. विद्यार्थी व्यवसाय मार्गदर्शन केंद्र
३. विद्यानगरी परिसरातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी सेवा योजना
४. मागासवर्गीय पात्र विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य
५. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत योजना
६. शिक्षकेत्तर कर्मचा-यांकरिता गट विमा योजना

**अनावर्ती खात्याची स्थिती पुढीलप्रमाणे आहे:**

अनावर्ती खात्यात प्रामुख्याने १) जमीन आणि इमारत यासाठी रुपये ८१.५८ कोटी, २) साधनसामुग्री रुपये १७.२९ कोटी, ३) फर्निचर रुपये १६.१७ कोटी, ४) पुस्तकांसाठी रुपये ३.४० कोटी, ५) अन्य खर्चासाठी रुपये ०.६२ कोटी, ६) सयंत्र व यंत्रसामुग्री रुपये १.१० कोटी आणि ७) इंडोमेंटसाठी रूपये ०.०२ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| एकुण अनावर्ती उत्पन्न | रु. २०.९९ कोटी |
| एकुण अनावर्ती खर्च | रु. १२०.१८ कोटी |
| अनावर्ती खात्यातील एकुण तूट | रु. ९९.२० कोटी |

तसेच, त्यांनी पुस्तिकेतील परिशिष्ट दोन सभागृहातील सदस्यांचे लक्ष वेधले. विवरणपत्र 'ड' मध्ये आवर्ती जमा व खर्च आणि विवरणपत्र 'इ' मध्ये आवर्ती शिल्लक, निव्वळ आवर्ती/अनावर्ती तूट व एकंदर शिल्लक/तूट यांचा तपशीलवार ताळेबंद दिलेला आहे.

अर्थसंकल्पीय वर्ष २०२२-२०२३ चे अंदाजपत्रकात समाविष्ट असलेल्या नवीन योजना/उपक्रम त्याकरीता केलेली तरतूद याची माहिती खालील प्रमाणे नमूद करीत आहे

अर्थसंकल्पामध्ये रू. १३.६५ कोटी इतक्या रक्कमेचे अंशदान विविध प्रकारच्या

| अ.क्र. | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ | रूपये (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १. | नवीन इमारती | ५०.०० |
| २. | इमारत दुरुस्ती | १३.६५ |
| ३. | डिजिटल विद्यापीठ | ३५.०० |
| ४. | अपंग फ्रेंडली कॅम्पस | २२.५० |
| ५. | ICTसुरक्षा पायाभूत सुविधा | १०.०० |
| ६. | नवीन उपइमारती :कॅम्पस- | ५.०० |
| ७. | सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य. | २.६१ |
| ८. | प्रख्यात विद्याशाखा, प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापक राखून ठेवण्यासाठी आणि आकर्षित करण्यासाठी कॉर्पस फंड | २.५० |
| ९. | एनईपीच्या अनुषंगाने इंटर्न आणि अप्रेंटिसशिप | २.५० |
| १०. | संशोधन सल्लागार समिती | २.५० |
| ११. | सौर ऊर्जा आणि हरित हायड्रोजन | २.५० |
| १२. | NEPअंमलबजावणी प्रशिक्षण)ए जागरूकताए कार्यशाळाए डिजिटायझेशन इ(. | २.०० |
| १३. | सेमिनार,कार्यशाळा आणि परिषदा | १.२५ |
| १४. | उपकॅम्पसमध्ये पायाभूत सुविधा वाढवणे- | १.१५ |
| १५. | विद्यार्थी हेल्पडेस्क आणि सिंगल विंडो | १.०० |
| १६. | संशोधन विकास कक्ष | १.०० |
| १७. | भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) | १.०० |
| १८. | रँकिंग आणि ब्रँडिंग उपक्रम | १.०० |
| १९. | राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी केंद्र आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचे लिंकेज/ऑफिस | १.०० |
| २०. | IQACमजबूत करणे | ०.५० |
| २१. | व्यावसायिक आणि कौशल्य विकास उपक्रम | ०.५० |
| २२. | उपकॅम्पस म्हणून क्रीडा विकास- | ०.५० |
| २३. | हस्तलिखिताचे डिजिटायझेशन | ०.५० |
| २४. | बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे करणे | ०.५० |
| २५. | G. अध्यक्षपद साजरे करणे २० | ०.५० |
| २६. | नवीन मुलींचे वसतिगृह | ०.२५ |
| २७. | अण्णाभाऊ साठे अध्यासन | ०.२० |

निधीमध्ये केलेले आहे. यामध्ये विकास निधी, घसारा निधी, आकस्मिकता निधी, कर्मचारी घर बांधणी निधी, सींकींग निधी, कुलगुरू निधी, निवृत्ती वेतन निधी आणि इतर निधी यांचा समावेश आहे.

**प्रा. (सी.ए.) प्रदीप कामथेकर** यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचा समारोप करताना. वर्ष २०२३-२०२४ चे अर्थसंकल्प तयार करण्यासाठी घेतलेल्या सक्रीय सहभागाबद्दल आणि मौलिक मार्गदर्शनाबद्दल त्यांनी विद्यापीठ उपपरिसर, विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ, परिक्षा व मुल्यमापन मंडळ माहिती व तंत्रज्ञान मंडळ, इतर संबंधित मंडळांचे तसेच सर्व अधिष्ठात्यांचे व सहयोगी अधिष्ठात्यांचे विशेष आभार मानले. तसेच विद्यापीठाच्या प्रशासन विभागातील, वित्त व लेखा विभागातील आणि विद्यापीठ मुद्रणालयातील कर्मचारी यांनी केलेल्या अथक परिश्रमाबद्दल त्यांचेही आभार मानले.

सन २०२२-२०२३ चा सुधारीत व सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प या महनीय सभागृहापुढे विचारार्थ, स्वीकृतीसाठी आणि मंजुरीसाठी सादर केले.

माननीय कुलसचिव यांनी **प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर,** वित्त व लेखाधिकारी यांचे आभार व्यक्त केले. व सन्मानीय सदस्यांना अर्थसंकल्पबाबत चर्चा तसेच त्यांच्या काही सुचना असतील ते सांगण्यासाठी आवाहन केले.

याबाबत **श्री मयुरेश नेटकर** यांनी सांगितले की हंगामी कर्मचाऱ्यांच्या वेतना बाबतीत माननीय सर्वोच्च न्यायालयाचा जो निर्णय आलेला आहे त्यामुळे विद्यापीठावरती खूप मोठा आर्थिक भार येणार आहे तर यासाठी या अर्थसंकल्पात कुठेही तरतुद दिसुन आलेली नाही तर याबबातची माहिती या ठिकाणी मिळावी.

***श्री. संतोष परब*** यांनी सभागृहात खालील प्रमाणे काही प्रश्न उपस्थित केले :

१ Revised Budget Estimate आणि Estimated Budget मध्ये किमान २५ ते ३० टक्क्याची घट दिसून येत असून, यात आपण एक कारण सांगितले की, शासनाकडून जो निधी यायचा आहे तो काही आलेला नाही. ज्यामुळे आपण जे budget केल होते त्याच्यापेक्षा revised budget जास्ती झालं आहे खर्च जास्त झाला आहे.

२ आपण इनकमसाठी जी तदतुद केली आहे त्याच्यामध्ये सरकारकडून काही फंड यायचे बाकी आहे असे सांगितले ती रक्कम ३०० कोटी आहे, जर त्या ३०० कोटींपैकी काहीही रक्कम ही आली नाही तर हया वर्षी जी तुट आहे ९९ कोटींची त्याने वाढणार आहे का? यासंदर्भात सभागृहात चर्चा झाली.

आमदार श्री. सुनिल राणे यांनी अर्थसंकल्पाला समर्थन दिले. परंतू त्यांनी अर्थ संकल्पावर चर्चा करण्यासाठी एक दिवसाचे चर्चा सत्र विद्यापीठाने आयोजित करावे व त्यात सर्व अधिसभासदस्यांना चर्चेसाठी आमंत्रीत करावे अशी मागणी केली.

यावर माननीय कुलगुरू यांनी सभागृहास आश्वासित केले सन्माननीय सदस्य श्री. सुनिल राणे यांच्या सुचनेचा विद्यापीठ प्रशासन गांभीर्याने विचार करेल व अर्थसंकल्पावरील चर्चा करण्यासाठी एक दिवसाचे चर्चा सत्र आयोजित करण्यात येईल. असे आश्वासन दिले.

**श्री. धनेष सावंत** यांनी वित्तीय वर्ष २०२३-२४ साठीच्या अर्थसंकल्पाला समर्थन दिले. सदर अर्थसंकल्पात प्रशासनाच्या वेतनावरील खर्च खुप जास्त दिसून येत आहे त्यामुळे शासनाकडून जे विद्यापीठास वेतनापोटी रक्कम येणे बाकी आहे, त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने प्रयत्न करावे. त्यासाठी या ठिकाणी उपस्थित असलेले सन्माननीय आमदार महोदय श्री. विलास पोतनीसजी व श्री. सुनिल राणे साहेब आपणांस शासन दरबारी नक्कीच मदत करतील, असे सुचविले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला बळकटी देणारा व पुढे घेवून जाणारा तसेच विद्यार्थी केंद्रित व संशोधनाला चालना देण्यासाठी भरपूर निधीची तरतूद केलेला अर्थसंकल्प आहे, असे मा. कुलगुरूंनी मत व्यक्त केले.

वित्त व लेखा अधिकारी प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर, यांनी सादर केलेल्या २०२३-२४ या वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकास सन्माननीय सदस्या श्री. कविता लघाटे यांनी अनुमोदन दिले. सदर अर्थसंकल्प सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**आमदार श्री. सुनिल राणे** यांनी ही अर्थसंकल्प मंजुर करण्यात समर्थन दिले. परंतु यात उपस्थित असलेले सदस्यांनी आपआपले विचार मांडावेत. तसेच अर्थसंकल्पावरीले चर्चा ही काय तासाभरात संपणार नाही अर्थसंकल्पावर चर्चा करण्याकरिता एक दिवस निवडावा असे सुचविले.या अर्थसंकल्पाच्या संदर्भामध्ये मागच्या २०२२ आणि २०२३ वर्षामध्ये जी काही तूट दाखवली किंवा काही शिल्की अर्थसंकल्पामध्ये उरली आहे का? आणि उरली असेल तर तो कसा वापरणार आहोत. उदा. मुलींच्या वसतीगृहात आणखीन २५ लाख रूपये द्यायचे आहेत तर मागचे किती खर्च झाले आणि जी वसतीगृहे उभे आहे त्यांचा एखादा फोटो दाखवला पाहिजे की, गेल्या २०२२ आणि २०२३ ला ही कामे केली आहेत. हे ४००-५०० कोटी रूपये विद्यापीठाने असे खर्च केले. या सुचना केल्या. आपल्याला खरोखर मुंबई विद्यापीठ सुधारणा म्हणजे, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने सुध्दा इथे काहीतरी संशोधन म्हटलं आहे तरी आपल्याला संशोधन करायचं आहे म्हणून त्यांच्यासाठी निधी ठेवला आहे. तर त्यामुळे या सर्वांवर चर्चा करण्यासाठी एक दिवस देण्यात यावा.

सन्माननीय सर्व सदस्य त्यांच्याबद्दलचे प्रश्न ते तयार करतील, जे ३०० कोटी रूपये विद्यापीठाला सरकारकडून यायचे त्याबाबतचा पाठपुरावा आम्ही करू. शासनाकडे ३०० कोटी रूपयांची जी तरतूद किंवा जे शासनाकडून विद्यापीठाला यायचे आहे जे प्रलंबित आहे ते कशासाठी खर्च करायचे आहे तर वेतनासाठी द्यायचे किंवा जे प्रश्न विचारले गेले ते प्रश्नाला आधारित असलेले पैसे शासनाकडून यायचं आहेत का? अश्या पध्दतीने अर्थसंकल्पामध्ये चर्चा करावी लागेल. एका बाजुला म्हटलं की कॉलेज संलग्नता २०१३-१४ ला ७०७ होती तर २०२२-२३ ला ८६० झाली. २०१३-१४, २०२२-२३ मधली वाढ आहे ही किंबहुना आठ वर्षामध्ये विद्यापीठातील महाविद्यालयावरील वाढ किती टक्क्यांनी आहे, जर बघितले तर १० टक्क्यांनी आहे. आपण कोणत्या महाविद्यालयाला मान्यता देतो? कसे देतो? त्यांचा दर्जा काय, गुणवत्ता काय, विद्यार्थ्यांच्या दर्जा काय हे सगळं जर लक्षात घेतले तर विद्यार्थ्यांची संख्या किती वाढली २०१३-१४ ला ६,८७,४४२ होती ती वाढली किती २०२२-२३ म्हणजे आपण दर वर्षाचा की दहा-दहा वर्षाचा अंदाज घेतो. कारण मधली वर्ष दाखविण्यात आली नाही. तर ती दाखविण्यात यावी असे सुचविण्यात आले.

वर्ष २०२२-२३ ला ८,५६,५७१ आणि वाढ किती झाली तर १९.७४ टक्के मग २०२३-२४ ला काय अपेक्षा करत आहोत. किंबहुणा, या मुंबई विद्यापीठामध्ये असलेल्या या सर्व संलग्न महाविद्यालयांची स्थिती त्यांच्याकडे येणारे विद्यार्थी आणि ऑनलाइन शिक्षण पध्दती सुरू केल्यामुळे होणारी गळती आणि विद्यापीठाचा दर्जा आपण आणखीन उंचावत नेल्यामुळे नवीन येणा-या महाविद्यालयांची संख्या आता त्याच्यामध्ये जर आपण बोलायला गेलो तर अनेक विषय आहेत. आपण AICTE कडून आल्यानंतर संलग्नता विषय येतो आणि त्यांच्या तारखा ठरवून घेतो की ३० जून, ३० जुलै मग ऑक्टोबर याच्यामध्ये सुध्दा जो घोळ आहे तो आपण सुरक्षित केला पाहिजे कारण AICTE आता ऑनलाईन सगळे चेकिंग करते, ज्यावेळेला AICTE ऑफलाईन करायाची तर मला माहिती आहे की काय स्थिती व्हायची. AICTE कडून आणल्यानंतर आपण विद्यापीठ त्या वर्षाला संलग्नता दयायचे नाही कारण त्यावेळेला आपली तारीख निघून जायची. मग वर्ष- वर्ष त्यांनी संलग्नतेसाठी भरलेले पैसे जे सरकारकडे भरलेले पैसे कधीच परत येत नाहीत कोणत्याही बाबतीत, त्यामुळे लोकांनी अतिरिक्त कोर्सेससाठी भरलेले पैसे आपण तपासणी न झाल्यामुळे, अहवाल वेळेवर न गेले, AICTE ची मान्यता वेळेवर नाही आली अशामुळे अनेक महाविद्यालयांचे पैसे आपल्याकडे पडून असतात. तर ते आपण दाखवले पाहिजे ना की महाविद्यालयाला आपण संलग्नता देवू नाही शकलो. पण आपण दोन दोन लाख रुपये त्यांच्याकडून घेतले, एक एक लाख आपण त्यांच्या कडून घेतले. अधिकृत शुल्क, ती प्रस्तावित शुल्क त्या महाविद्यालयाने आपल्याकडे भरली पण मान्यता दिली नाही. तर ते शुल्क कुठे गेली तर ते आपल्याकडे जमा आहे. किंबहुना एफ.डी. ला आहेत. ती दाखवण्यात यावी अश्या अनेक गोष्टींचा भरलेला हा अर्थसंकल्प आहे.

या अर्थसंकल्पामध्ये जे २७ मुद्दा काढले आहेत, अण्णाभाऊ साठे अध्यासन हा शेवटचा मुद्दा आहे त्याच्यात वीस लाख रूपये तुम्ही प्रस्तावित केले आहेत आणि त्याच्यामुळे सगळयात जास्त तुम्ही ८८ कोटी, ८१.५८ कोटी जमीन आणि इमारत. आता

मुंबई विद्यापीठाच्या २७ इमारतींन OC नाही अशी चर्चा आहे. मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधल्या किती इमारतींना OC नाही. याबाबत आश्चर्य व्यक्त केले असून, त्याच्यावर भाष्य केले पाहिजे, आपलं विद्यापीठ हे जरी महामहीम राज्यपालांच्या निर्देषानुसार चालत असले तरी आपल्या बिल्डिंगच्या OC आपण का नाही घेत.

कलिना कॅम्पसची दुर्दषा आपल्या सगळयांना माहित आहे आणि कलिना कॅम्पसमध्ये आपण काय करणार? नवीन इमारती, इमारत दुरुस्ती, नवीन डिजिटल विद्यापीठ, डिजिटल विद्यापीठ ही संकल्पना ३५ कोटीमध्ये राबवली जाऊ शकते का? या देशातला विद्यार्थ्यांनी बनविलेला पहिला सॅटेलाईट कोणी केला तर आय.आय.टी. खरकपूर, आय. आय.टी. मुंबई आणि अथर्व महाविद्यालय त्याचे रडार स्टेशन उभारायला कोटयावधी रूपये लागले आणि २००६ ला ती प्रक्रिया सुरू झाली आणि २०१७ ला मागे लागल्यानंतर, माननीय पंतप्रधानांनी २०१८ मध्ये अवकाश दिले आणि त्यासाठी करोडो रूपये खर्च झाले. सॅटेलाईटचा ट्रान्सस्क्रिप्ट जेव्हा येतो, तो छाननी केला जातो, श्रीहरी कोटयाला जातो आणि त्यानंतर आपण खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांना तो देतो, त्याचा करोडोचा खर्च आहे. ३५ कोटी मध्ये डिजिटल विद्यापीठ काय आणि कसे करणार? याचे सादरीकरण केले असते तर कळले असते की, डिजिटल विद्यापीठ म्हणजे काय? त्यामुळे विनंती आहे की, डिजिटल विद्यापीठ, इमारत दुरूस्ती, नवीन इमारती, सौर उर्जा, हरित हायड्रोजन-अडीच कोटी, त्यामुळे हे खर्च करत असताना आपण कोणती पध्दती अवलंबवणार आहोत हे सर्वांच स्पष्टीकरण होण्याकरिता एक दिवस ठरवावा, सर्व सदस्यांचा वेळ ठरवून आपण या सर्वांकरिता चर्चा करूया.

जेणेकरून येणा-या नवीन कुलगुरू, प्र-कुलगुरूंसाठी नवीन दिशा मिळेल, अशा पध्दतीचे काम आपण पुढच्या दोन ते चार महिन्यामध्ये केले पाहिजे आणि हे जर केले तर आपण बाहेर जाऊन सांगू शकतो. अनेक नवीन सिनेट सदस्य निवडणुकीच्या माध्यमातून येतील. तरूण असतील, होतकरू असतील, विद्यापीठाचा अभ्यास असेल. अश्या सगळयांना बरोबर घेऊन जात असताना काहीतरी सुधारणा घडेल काहीतरी सुधारणा झाल्या कागदावर नाही वास्तविकेमध्ये आणि त्या सगळया होण्यासाठी माझी एकच सूचना आहे की या बजेटच्या संदर्भामध्ये थोडक्यात सूचना मांडून आपण बजेट मंजूर करू पण त्या बजेट वरील चर्चा ही एक दिवस आपण करावी अशी विनंती आमदार श्री. सुनील राणे यांनी केली.

मा. आमदार सुनिल राणेंनी ज्या काही सूचना दिलेल्या आहेत. आमचा विधानसभेमध्ये जी अंदाजपत्रक असतात तर ती आम्हाला चार दिवस चर्चा करायला देतात. त्याकरिता काही सूचना आम्ही आपल्याला केलेल्या आहेत त्याचा देखील विद्यापीठाने विचार करावा अशा विनंती केली. आम्हाला देखील आमचं विधानपरिषद चालू असल्यामुळे, आपल्या संदर्भात देखील दोन-तीन प्रश्न आहे अंदाजाने टेनिस असोसिएशन बद्दल इकडची जागा गिळंकृत केली आहे. विचारण्याचा उद्देश एवढाच असतो की, त्याच्यामध्ये सुधारणा होऊन आपल्याला उत्तर आलं पाहिजे.

डॉ. अजय भामरे यांनी पुढे अशी विनंती केली की, मा कुलगुरू महोदयांनी थोडं मार्गदर्शन करावे.

**डॉ. प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू)** यांनी सभागृहातसर्व सन्माननीय सदस्य आणि सहकारी तसेच या सभेसाठी निमंत्रित केलेले पत्रकार बंधू भगिनी, माझे प्रशासकीय अधिकारी प्रा.(सी.ए.) प्रदिप कामथेकर यांनी मुंबई विद्यापीठाचा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यामध्ये त्यांनी वैशिष्टये पण आपल्यासमोर मांडलेली आहे.

आत्ताच सन्माननीय सदस्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या त्या अपेक्षा व्यक्त करत असताना समोरची आव्हाने काय आहे त्याच्यामध्ये वाच्यता केली या सगळया गोष्टी आपण पुढे घेऊन जात आहोत आपल्यापुढे एक विशिष्ट परिस्थिती आहे. प्रभारी कुलगुरू किंवा प्र-कुलगुरू किंवा काही अन्य अधिकारी असल्यामुळे आपण अर्थसंकल्पामध्ये बघायची दृष्टी अशी प्रभारी ठेवली असे मुळीच नाही ज्या वेळेला कुलगुरू पदाचे charge असेल किंवा इतर अधिकारी त्या-त्या chair मध्ये असतील तर ते पूर्ण क्षमतेने आणि पुढच्या दृष्टीने या सगळया गोष्टीकडे पाहतोय.

यामध्ये संधी पण आहे आणि आव्हाने पण आहेत. पण जी परिस्थिती आहे ती क्रिटिकल अशा अर्थाने आहे की थोडया वेळापूर्वी प्र-कुलगुरूंनी सांगितलेली एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी विद्यापीठ कॅम्पस आणि सर्व संलग्न महाविद्यालय यांच्या माध्यमातून करणार आहोत. ज्या वेळी आपण अंमलबजावणी असे म्हणतो त्यावेळेला खूप सारे संसाधने लागतात आणि त्याची जागरूकता असेल, ट्रेनिंग असेल या सगळया गोष्टी लागतात तर ते आपल्या दृष्टिने एक महत्त्वाची बाब आहे, हा अर्थसंकल्प सादर करत असताना त्याची आपण विशेष नोंद घेतलेली आहे. दुसरी गोष्ट अशी की **bodies** चे इलेक्शन आणि नवीन बॉडी आता निर्माण होत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून एक निवडणुकीची घोषणा अगोदरच झालेली आहे. शिक्षक, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी आणि प्राचार्य या सगळयांचे आधीच निवडणूक घोषीत झालेले आहे. पदवीधर मतदार संघाची निवडणूक आत्ता लगेच घोषीत होईल आणि मग सगळया प्राधिकरणांची निर्मिती पुढच्या दोन अडीच महिन्यामध्ये पूर्ण होईल अशी आशा आहे.

विद्यापीठाच्या कायदयात आणि परिनियमांना अनुसरून ज्या ज्या तरतुदी आहेत त्यानुसार या नविन बॉडीजंना घेऊन आपण पुढे जाणार आहोत. पहिल्या पानावर त्यात एक वाक्य या अहवालामध्ये आपल्याला दिसेल "mearly providing budget doesn't mean that it is sanctioned" त्याच्या त्या प्रक्रियेचा भाग आहे ते होऊन जाईल. दुसरी गोष्ट अशी आहेत की, G20 presidency आणि international year of millets या दोन गोष्टी आहेत. आता या दोन गोष्टींचा आपण या बजेटमध्ये कोणत्या दृष्टीने समावेश करतो तर युनिव्हर्सिटी ग्रांट कमिशन आपल्याला डायरेक्शन दिलेले आहे आता दोन डायरेक्शन आलेले आहेत त्यात एक डायरेक्शन अशी आहे की, G20 च्या अंतर्गत युनिव्हर्सिटी कनेक्ट नावाचा programme आपल्याला राबविणे आवश्यक आहे.

त्याचे मार्गदर्शक तत्त्वे आपल्याला आहेत. त्याच पध्दतीने चार दिवसांपूर्वी युनिव्हर्सिटी ग्रांट कमिशनने भरड धान्य वर्ष कश्या पध्दतीने साजरा करायचा त्याच्या मार्गदर्शक सूचना पण दिलेल्या आहेत आणि ते आपण फक्त विद्यापीठ कॅम्पस नाही आहे आपल्याला जो सहाशे किलोमीटर जो पट्टा लाभलेला आहे.

त्यामधली विविधता आहे या भरड धान्याचे प्रमोशन सुध्दा आपण करणार आहोत आणि अर्थातच यामध्ये संलग्न महाविद्यालयाची भूमिका अतिशय चांगली, उपकारक आणि महत्त्वाची ठरणार आहे.

सन्माननीय सदस्यांनी डिजिटल विद्यापीठाचा उल्लेख केला त्याच्याबद्दल मला थोडेसे भाष्य करावयचा आहे की, automation of the process in University (विद्यापीठात ऑटोमेशन प्रक्रिया) हा आपला प्राधान्याने बघाण्याचा उद्देश आहे. उदाहरणार्थ, आपलं finance घेतले तर finance आपलं ऑटोमेशन करायला लागणार आहे. आपली ॲफिलियेशन(affliation) सिस्टम बघितली तर ॲफिलियेशन(affliation) सिस्टमाची total ऑटोमेशन करायला लागणार आहे.

एका बाजूला ई-समर्थ विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission) प्रोत्साहन(promote), ministry of education promote करतय. तर दुस-या बाजूला integrated university management system (iums) महाराष्ट्र शासन प्रोत्साहन (promote) करताय आणि त्याच बरोबर आपल्या स्वत:चा काही प्रणाली (system) आहे. त्यासुध्दा आपल्याला घेऊन पुढे जायचे आहे. आपला स्वत:चा data centre असेल ज्या process already आपण सुरू करून initiate घेऊन पुढे गेलेलो आहोत त्या सगळयांना घेऊन जाणे आवश्यक आहे.

तसेच मा. कुलगुरूंनी पुढे सभागृहात असेही सांगितले की, आपल्याला कल्पना आहे की, मागच्या दोन वर्षामध्ये सगळयांच्यावर विचित्र परिस्थिती उद्भवली मग आपण सगळया गोष्टी online करायला लागलो. शिकवण्यापासून ते परिक्षेपर्यंत राईट फ्रॉम टीचिंग to evaluation मधल्या सगळया सर्व process आपण online केल्या ते online करताना आपल्याला सगळयांना माहिती आहे की आपल्याला खूप dependence आपला वाढला आहे. आपण दुस-या प्रणालीवर depend राहिलो तर यातल्या कोणत्या प्रणाली आपल्याला आपल्या level मध्ये करू शकतो यासाठी आपण तरतुदी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. ३५ कोटी तसे नगण्य आहे एक वर्षाची सुरूवात करायची असेल तर आपण सुरूवात करून घेऊ निधी कमी पडला तर revised मध्ये घेऊ त्याचा पुढचा टप्पा (phase) मध्ये जाऊ. पण या सगळया गोष्टी करणे अतिशय आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, नवीन परिसर होणार आहे अंबाडवे असेल तळेरे असेल किंवा मरीन सेंटर आपण केलेला आहे.

अलीकडच्या एक दोन महिन्यांमध्ये आंबोलीच्या शेजारी आपल्याला एक परिसर मिळतोय आणि त्याची कम्युनिकेशन फॉर्मल कम्युनिकेशन शासन आणि विद्यापीठ याच्यामध्ये होत आहेत आणि तो परिसर मिळाला तर तिथे सुध्दा आपल्याला पुढे अभ्यासक्रम किंवा इमारती बांधणं आवश्यक आहे. याचा अर्थ असा की we are going to add with new campus या सगळया गोष्टी आहेत आणि मग राष्ट्रीय शैक्षणिक धोरण करत असताना स्वायत्त महाविद्यालय एका बाजूला, कारण त्यांना स्वायत्तता ऑलरेडी आहे आणि स्वायत्तता नसलेली महाविद्यालये आणि विद्यापीठ कॅम्पस त्यांच्यासाठी जी राबनुक करायची आहे ती अतिशय चांगल्या पध्दतीने चालू आहे.

हे वैशिष्टय चांगल्या शब्दात आणि अतिशय कमी वेळात कामथेकरांनी सांगितलेले आहे. मी असे म्हणेन की राष्ट्रीय, शैक्षणिक धोरणाला बळकटी देणारा आणि पुढे घेऊन जाणारा तसेच कालानुरूप जे बदल घडवायचे आहेत त्या सगळयांची तरतूद असणारा विशेष अर्थसंकल्प आहे. मुंबई विद्यापीठाच्या अर्थसंकल्पाबाबत ज्या सूचना सन्माननीय सदस्यांनी मांडल्या की, त्यावर साधक बाधक एक चर्चा होण्यासाठी मी सूचित करतो की, याबद्दल गांभीर्याने विचार करावा, चर्चेचे आयोजन कधी करता येईल? कशा पध्दतीने करता येईल? त्यासाठी कोणती मोडस ऑपरेंडी (modus operandi) तुम्हाला देता येईल का? याबाबत चर्चा झाली. प्रशासन त्याच्याबद्दल निश्चितच गांभीर्याने विचार करेल परत ज्या ज्या वेळेला फॉर्मल बैठका असतात.

त्या-त्या वेळेला या सगळया गोष्टी होतच असतात. आपल्याला माहित आहे ज्या-ज्या वेळेला सन्माननीय सदस्य म्हणून एक विद्यापीठाकडे काही सूचना करत असतात, काही मागणी करत असतात त्या सगळया गोष्टी आपण पुढे घेऊन जात असतो. मला वाटते, आजच्या बैठकीमध्ये सगळयात महत्त्वाचा विषय अर्थसंकल्पाचा आहे, जो ३१ मार्च अगोदर मान्य करायचा असतो आणि त्यास सभागृहाने त्याला मंजूरी द्यायची असते. सन्माननीय सदस्यांनी ऑलरेडी त्याबद्दल मंजुरी दिलेली आहे आणि आपण पुढची चर्चा चालू ठेवावी अशी विनंती सभागृहाला केली.

विद्यापीठाच्या गेल्या ५-६ महिन्यामधल्या बाबी पाहिल्या तर खूप सा-या विकासात्मक बाबींचा उल्लेख कुलसचिवांनी आढावा मध्ये घेतलेल्या आहे आणि त्या तशाच पुढं चांगल्या जोमाने चालू आहेत. या विद्यार्थी केंद्रित शिक्षकांना त्यांचचं जे काही स्वायत्त जे आहे. शैक्षणिक म्हणजे शिकवणे, evaluation करणे त्याला बाधा न आणता संशोधनाला चालना देण्यासाठी सुध्दा आपण भरीव तरतूद केलेली आहे. नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाने Research and development Cell सुस्थापित केलेला आहे, innovation section head company च्या काही activities आहे. त्या सगळया आपण पुढे घेऊन जात आहोत. जरी आव्हान असेल तरी सुध्दा मुंबई विद्यापीठाची जी strength (शक्ती)आहे ती strength (शक्ती) already दोन गोष्टी मध्ये दिसलेली आहे, ती गोष्ट म्हणजे NAAC ची अतिशय चांगली grade आणि अतिशय चांगला CGPA मिळालेला आहे जो top institute ला साजेसा असा आहे आणि NIRF च्या ranking पहिल्या १०० मध्ये आहे व दोन indicator आहे, ते आपल्याला strength (शक्ती) सांगतायत आणि त्या टिकवणे आणि त्याच्यामध्ये वाढ करणे या दोन गोष्टी आपण निश्चित घेऊन जाऊ. आपल्या सगळयांच्या सहकार्याने सूचनांचा सकारात्मक विचार करून आपण पुढे जायला काही हरकत नाही असे सुचविले.

तद्नंतर **श्री. धनेश सावंत** यांनी प्रा.(सी.ए.) कामथेकर यांचे अभिनंदन केले. पाच वर्षांमध्ये मुंबई विद्यापीठाच्या फायनान्स वरती खूप मोठा प्रसंग आला होता, असे सांगितले, आपले बरचसे ऑडिट झाले नव्हते आणि तो काळ खूप स्ट्रगलिंग गेला. त्यावर बरेचसे आरोप प्रत्यारोपण झाले पण त्यातून आपण सावरलो. त्यातले बरेच ऑडिट झाले. ती बाब आली नाही ती सभागृहातसमोर यायला पाहिजे होती, की जवळ पास सात आठ वर्षाचे ऑडिट राहिले होते त्यातला बराचसा भाग पूर्ण झाला आहे, ती बाब तुम्ही सभागृहासमोर आणायला पाहिजे होती.

आता सन्माननीय विधानसभा परिषद आणि सभेचे सदस्य निघून गेले. त्यांना हीच विनंती करायची होती कारण मागच्या काळामध्ये पण बजेट कमिटीमध्ये काम करताना एकच गोष्ट जाणवली ती म्हणजे आपले बराचसा खर्च प्रशासकीय पगारावर होतो. हे माहित आहे, कारण बरीच पदे निर्माण झालेली आहेत पण त्याचा काही भरणा सरकारकडून होत नाही. बराचसा भार हा मुंबई विद्यापीठाच्या खर्चा वरती पडला जातो. त्यामुळे बऱ्याच वेळेस तूट ही जाणवली जाते तर मी आपल्या सर्वांच्या माध्यमातून आता या उपस्थित सन्माननिय सदस्यांन समोर जी काय सरकारी दरबारी मागणी आहेत ते ३६० कोटी विविध हेड खाली अडकलेले आहेत आणि सरकार पॉझिटिव्ह आहे तर त्या गोष्टी मिळाल्यानंतर आपण बऱ्याचशा गोष्टी त्याबाबतीत करू शकतो. कुलगुरूंना विनंती केली की, कॅम्पस कमिटी, कॅम्पस डेव्हलपमेंट फंडा बाबतीत जे काय आपल्याकडे कॉम्पोझिशन एम.एम.आर.डी. ए. देणार आहे. बजेटची माहिती द्यावी समर्थन केले.

**डॉ. अजय भामरे** (प्रभारी प्र-कुलगुरू) यांनी सभागृहात सांगितले की, कॅम्पस डेव्हलपमेंट एम.एम.आर.डी. ए. आपली जागा घेतली आहे. त्याच्यामध्ये करार (एग्रीमेंट) झाला आहे, त्या करार (एग्रीमेंट) प्रमाणे आपल्याला काही भरपाई मिळणार आहे, त्या भरपाईबद्दल एम.एम.आर.डी. ए. ने एक एजन्सी नेमलेली होती ती एजन्सी मास्टर प्लॅन बनवून देणार असा विषय होता. त्या संदर्भात या आधीचे माननीय कुलगुरू महोदयांनी राज्यपाल महोदयांना पत्र लिहिलं होत जी भरपाई आहे ती पूर्ण नाहीये. त्या संदर्भात माननीय राज्यपाल महोदयांना राजभवनामध्ये एक मिटिंग बोलावली होती. त्या मिटिंगमध्ये एम.एम.आर.डी. ए. चे अधिकारी, स्वत: माननीय कुलगुरू महोदय आणि राज्यपाल महोदयांना एम.एम.आर.डी. ए. ला निर्देश दिले आहेत हे जे भरपाई आहे हे जास्त देण्यात निर्णय होईल तो आपल्याला कळवण्यात येईल.

डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) शैक्षणिक वर्ष २२-२३ करता जे अंदाजपत्रक प्रस्तावित केला आहे त्याला डॉ. कविता लघाटे यांनी अनुमोदन दिले.

डॉ. सुनिल भिरूड (प्रभारी कुलसचिव) यांनी सभागृहात सांगितले की, सन्माननीय सदस्य आपण आपला अमूल्य वेळ काढून आजच्या या अधिसभेच्या वार्षिक सभेसाठी आलात आणि आम्हाला वेगवेगळ्या विषयावरती मार्गदर्शन केले. काही बाबतीत अन्य आमदारांनी सूचना सुध्दा केलेल्या आहेत. मार्गदर्शन आणि सूचना या वेळोवेळी कशा अंमलात आणल्या जातील आणि त्याबद्दल काय निर्णय घ्यायचा तो प्रशासकिय स्तरावरती आणि वेळप्रसंगी आपल्या मदतीने त्यावरती निर्णय घेण्यात येईल.

मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थित सदस्यांचे सभेमध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांनी केलेल्या सर्व सहकार्याकिरिता आभार मानून मुंबई विद्यापीठाच्या पुढील वाटचालीत सहकार्य तसेच सूचना करण्यासंबंधी आवाहन केले आणि सर्व सहकाऱ्यांप्रती आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांनी, अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याकिरिता आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने सभेचे कामाकाज संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

..................
कुलसचिव (प्र)

..................
प्र. प्र-कुलगुरु

..................
मा. कुलगुरु



Scanned with CamScanner